

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना न्यायाधीश वाय. पी. बावकर. सोबत इतर.

# दोडामार्ग हळबे महाविद्यालयात संविधान दिन साजरा

**दोडामार्ग : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत यांचा आदर, भारतीय स्मृती लढ्यातील आदर्शांची जोपासना, भारतीय सार्वभौमत्वाचे संरक्षण, धार्मिक, भाषिक, प्रादेशिक, वर्गीय भेद करू नये. आपणास मिळालेल्या संविधानाचे पालन करणे हे प्रत्येक भारतीयाचे मूलभूत कर्तव्य आहे, असे प्रतिपादन दोडामार्गचे न्यायाधीश वाय. पी. बावकर यांनी केले.

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात संविधान दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते. ते म्हणाले, की बंधुभाव जोपासणे, स्त्रियांचा आदर करणे, संमिश्र संस्कृतीचे व नैसर्गिक साधनसंपदेचे रक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन आत्मसात करून राष्ट्राला प्रगतिपथावर नेण्यासाठी ६ ते १४ वर्षे वयातील प्रत्येक बालकास समान व गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे ही आपली प्रत्येकाची जबाबदारी आहे. महाविद्यालय विकास समितीचे प्रमुख विवेकानंद नाईक यांनीही विचार मांडले, त[ऱ] ॲड. सोनू गवस यांनी भारतीय घटनेचे महत्त्व सांगू[न] तिची उपयुक्तता विषद करताना या लवचिक घटनेत कितीही बदल करता येत असले तरी मूळ चौकट मात्र बदलताच येणार नाही, असे सांगितले. प्राचार्य डॉ[.] सुभाष सावंत म्हणाले, की संविधान हा आपल[्या] सर्वांचाच पवित्र ग्रंथ आहे. अतिशय कष्ट आणि परिश्रमातून तयार झालेला हा ग्रंथ सर्वांनी वाचावा त्यानुसार आपले वर्तन करावे. आपली जडणघडण त्यानुसार असावी, असे प्रतिपादन केले. प्रास्ताविक डॉ. संजय खडपकर यांनी तर सूत्रसंचालन डॉ. पी. डी. गाथाडे तर आभार प्रा. प्रीति प्रसादी यांनी मानले.